# कार्यावली

## सोमवार, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मुंबई येथील विधान भवनात सुरू होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०१८ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनाची कार्यावली.

**एक.** : अध्यक्षांनी, सभाध्यक्ष तालिकेवर सदस्य नामनिर्देशित करणे.

**दोन.** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

**तीन.** : प्रश्नोतरे.

**चार.** : सन २०१८-२०१९ च्या पुरवणी मागण्या सादर करणे.

**पाच.** : सन २०१८-२०१९ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान.

**सहा.** : लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे.

**सात.** : अंदाज समितीचा अहवाल सादर करणे.

**आठ.** : सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे.

**नऊ.** : विधानसभा आश्वासन समितीचे अहवाल सादर करणे.

**दहा.** : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

**अकरा.** : पंचायती राज समितीचे अहवाल सादर करणे.

**बारा.** : इतर मागासवर्ग कल्याण समितीचा अनुपालन अहवाल सादर करणे.

**तेरा.** **शासकीय विधेयके.**

**खालील विधेयके विधानसभेकडे विचारार्थ प्रलंबित आहेत :-**

(१) सन २०१७चे वि.स.वि.क्रमांक ६४ - महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७.

(२) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक २९ - महाराष्ट्र (लोकसेवकांची) विसंगत प्रमाणातील मालमत्ता सरकारजमा करण्याबाबत विधेयक, २०१८.

(३) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक ३४ - हैदराबाद अतियात चौकशी (सुधारणा) विधेयक, २०१८.

(४) सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ५८ - महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८.

(५) सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ५९ - मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८.

(६) सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ६० - महाराष्ट्र ॲक्युपंक्चर चिकित्सा पद्धती (सुधारणा) विधेयक, २०१८.

(७) सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ६१ - महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८.

(८) सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ६२ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८.

**चौदा.** : इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल.

**पंधरा.** : शोक प्रस्ताव.

**सोळा.** : **अशासकीय विधेयके :-**

**विचारार्थ -**

(१) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ११ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०१५ - **श्री. छगन भुजबळ, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ६६ - अल्पसंख्याक समाज (अत्याचारास प्रतिबंध) विधेयक, २०१५ - **श्री. अमिन पटेल, वि.स.स. यांचे.**

(३) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ४३ - महाराष्ट्र लैंगिक गुन्हयांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती व जाहिरात-फलक लावण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०१६ - **श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचे.**

(४) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ५१ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१६ **- श्री. मनोहर भोईर, वि.स.स. यांचे.**

(५) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन (सुधारणा) विधेयक, २०१७ - **श्री. मनोहर भोईर, वि.स.स. यांचे.**

(६) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १४ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०१७ **- श्री. मंगलप्रभात लोढा, वि.स.स. यांचे.**

(७) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २२ - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७ - **ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांचे.**

(८) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३० - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१७ - **श्री. मनोहर भोईर, वि.स.स. यांचे.**

(९) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६९ - महाराष्ट्र लोकसेवा हक्क (सुधारणा) विधेयक, २०१७ - **श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे.**

(१०) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७० - सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७ - **श्री. मंगलप्रभात लोढा, वि.स.स. यांचे.**

**सतरा. अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६) :-**

**श्री. मनोहर भोईर, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १, २, ३, ४ व ५**

(१) " राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२) " राज्यात विशेषतः ग्रामीण भागातील बहुसंख्य गावांतून उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजना व त्यांच्या अंमलबजावणीत होणारी कुचराई, यामुळे ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्याअभावी होणारे हाल विचारात घेता पाणीटंचाई कायमस्वरूपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस हि विधानसभा शासनास करीत आहे."

(३) " राज्यातील देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळाडूंचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागातील होतकरू व तरुण खेळाडू देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरिता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४) " राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता या किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व कायम राखण्याच्या दृष्टीने शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५) " राज्यातील सर्व महामार्गावरील रहदारी ही मोठ्या प्रमाणावर वाढली असून त्याचे योग्यरित्या नियोजन होणे, अरुंद रस्ते, वळणे यामुळे अपघातांचे वाढते प्रमाण, त्यात होत असलेली मनुष्यहानी व वित्तहानी बघता यावर उपाय म्हणून सर्व राज्य महामार्ग व त्यांना जोडणारे रस्ते हे चौपदरीकरण करावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा ठराव क्रमांक ६**

(६) "राज्यात वेगवेगळया प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी, इ.बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ११, १३, १४ व १५**

(११) " देशाला स्वातंत्र्य मिळण्याकरिता लढा देऊन त्यासाठी काळ्या पाण्याची शिक्षा भोगून जनतेला मातृभूमी प्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतीकारकांचे प्रेरणास्थान असलेले स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना मरणोत्तर "भारतरत्न" प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१३) " महाराष्ट्र राज्यातील जनतेच्या सोयीसाठी मा.सर्वोच्च न्यायालयाचे एक खंडपीठ मुंबई येथे स्थापन करावे, अशी आग्रही मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१४)" मुंबईसह राज्यात रेल्वेचे सर्वाधिक जाळे पसरलेले असणे, सर्वाधिक महसूल प्राप्त होऊनही, केंद्राकडून पूरेशा प्रमाणात राज्यास निधी प्राप्त न होणे, महिला सुरक्षा, प्रलंबित योजना, रेल्वे समस्या, सुरक्षित प्रवास आणि प्रवाशांना अत्याधुनिक सेवा सुविधांकरिता, आवश्यक निधीची तरतूद करून व्यवस्थापन करण्यासाठी महाराष्ट्र राज्याकरिता "स्वातंत्र महाराष्ट्र रेल महामंडळ" स्थापन करावे अशी आग्रही मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१५) “ मुंबईसह राज्यात रेडी रेकनरच्या दरात दरवर्षी वाढ होत असल्याने, सदनिकांच्या किमतीत प्रचंड वाढ होत असणे, विभागीय सर्वोच्च विक्री दर रेडिरेकनरमध्ये ग्राहय धरण्यात येत असल्याने, सदनिकांच्या किमती, मूळ किमतीपेक्षा कितीतरी अधिक पटीने वाढणे यामुळे सर्वसामान्य जनतेस सदनिका खरेदी करणे आवाक्याबाहेर जाणे, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्यासाठी रेडी रेकनरचे वाढते दर स्थिर ठेवण्यासाठी राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी याबाबत राज्य शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. मंगलप्रभात लोढा, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १६, १७, १८, १९ व २०**

(१६) “ राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरीत्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जालसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१७) “ राज्यातील विशेषतः मुंबई, ठाणे, नवी मुंबई व इतर शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनाच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास परिणामी वाहतुकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१८) “ राज्यातील वाढती लोकसंख्या, वाढत्या औद्योगिक वसाहती, त्यामुळे शहरातून वाढलेली गुन्हेगारी, अपुरी पोलीस व्यवस्था, पोलिसांवर पडणारा मानसिक ताण, त्यातच महिलांवरील अत्याचाराचे वाढलेले प्रमाण, पोलिसांच्या अपुऱ्या संख्येमुळे तपासणीस होणारा विलंब, परिणामी महिलांना न्याय मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष, त्याकरिता पोलिसांच्या संख्येत करावयाची वाढ, पोलिसांच्या मानसिक स्थितीत सुधारणा करण्याकरिता तसेच महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(१९) “ राज्यातील जीवनावश्यक वस्तूंचे कडाडलेले भाव लक्षात घेता, राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानातून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्न धान्य व इतर जीवनावश्यक

वस्तूंचा नियमित पुरवठा होण्यासाठी सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२०) " द्रारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची यादी तयार करताना अनेक कुटुंबाचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटुंबाना पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित राहावे लागणे, शासनाच्या वतीने १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे मात्र वाढती महागाई आणि रुपयांचे झालेले अवमूल्य यामुळे रुपये ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्र्य-रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. छगन भुजबळ, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २१, २२, २३ व २४**

(२१) " राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतीना देखभालीसाठी हस्तांतरित करण्यात आलेल्या प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना व्यवस्थापना अभावी बंद पडतात, त्यामुळे सदर योजनांची देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने या सर्व प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२२) " राज्यातील मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेली एकूण ५० टक्के ही आरक्षणाची मर्यादा वाढवणे आवश्यक आहे, देशभरात सर्वत्रच मराठा तसेच अन्य कृषक जाती आरक्षणाची मागणी करत असून दक्षिणात्य राज्यांमध्ये सुमारे ६५ ते ७५ टक्के आरक्षणाची मर्यादा असल्याने नचिपण आयोगाचा अहवाल मंजूर करून ५० टक्के आरक्षणाची टक्केवारी ७० ते ७५ टक्के वाढवून मराठा समाजासोबतच इतर समाजालाही आरक्षण देण्याकरिता केंद्र शासनाने संसदेमध्ये ठराव संमत करून घेण्याकरिता केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभाा शासनास करीत आहे."

(२३) " शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, कीटकनाशके यांच्या किमतीमध्ये सतत होणारी वाढ तसेच शेतकऱ्यांना शेती मालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित असे शेती मालाचे भाव मिळण्याच्या

दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२४) " राज्यातील सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण अपूर्ण असल्यामुळे गरजू लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी अडचणी येत असणे, दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटुंबांना पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित राहावे लागत असणे, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांसाठी शासनाने रू. १५,००० ही उत्पन्न मर्यादा ठरवलेली असणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे किमान रुपये ५०,००० उत्पन्न मर्यादा करण्याची गरज निर्माण झालेली असणे, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांसाठी उत्पन्न मर्यादेबाबतचा निकष सुधारित करण्यासाठी तसेच सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. भारत भालके, वि.स.स. यांचा ठराव क्रमांक २६**

(२६) " राज्यात बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, गामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टचांई कायमस्वरूपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३६, ३७, ३८ व ३९**

(३६) " शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, कीटकनाशके यांच्या किमतीमध्ये सतत होणारी वाढ तसेच शेतकऱ्यांना शेती मालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेती मालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३७) " शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसानभरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या

जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३८) " विदर्भात वीज निर्मितीचे अनेक प्रकल्प असणे, राज्यातील वीज निर्मितीपैकी निम्मा वीज निर्मितीचा वाटा विदर्भाचाच असणे, मोठया प्रमाणावर वीज निर्मिती करूनही विदर्भातच मोठया प्रमाणात भारनियमन होणे, भारनियमनामूळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान, व्यापारी जगताचे होणारे आर्थिक नुकसान, विदर्भातील वीज इतरत्र जात असतांना सुध्दा विदर्भातील वीज ग्राहकांकडून वीज हाणीच्या नावाने पैसा वसूल करणे, विजे अभावी शेती सिंचनापासून वंचित राहाणे, यामूळे शेतकऱ्यांच्या पिकावर होणारे प्रंचड नुकसान, विजे अभावी विदर्भात उद्योग न येणे, परिणामी, बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, विदर्भाच्या वाटयाला प्रदुषण येवून विकासहीी न होणे, विदर्भात उत्पादीत उद्योगांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याची निंतात गरज लक्षात घेता तथा विदर्भातील भारनियमन रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३९) " राज्यातील उद्योग जगतात मोठया प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रंचड प्रमाणात वाढणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरूणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील बेरोजगार तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना भूमीपुत्रांना प्राध्यान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. सुनिल शिंदे, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ४०, ४१, ४२ व ४३**

(४०) " देशाला स्वातंत्र्य मिळण्याकरिता लढा देऊन त्यासाठी काळ्या पाण्याची शिक्षा भोगून जनतेला मातृभूमी प्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतीकारकांचे प्रेरणास्थान असलेले स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना मरणोत्तर "भारतरत्न" प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४१) " मुंबईसह राज्यात सदनिकांच्या किमतींत प्रचंड वाढ होणे, सदरहू सदनिकांच्या किमती मूळ किमतीपेक्षा कितीतरी पट अधिक असल्याने सर्वसामान्य जनतेस सदनिका खरेदी करणे आवाक्याबाहेर जाणे, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित करून स्थिर ठेवण्याची राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्यासाठी राज्य शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४२) " राज्यातील विशेषतः मुंबई, ठाणे, नवी मुंबई व इतर शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनाच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास परिणामी वाहतुकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४३) " मुंबईसह राज्यात रेल्वेचे सर्वाधिक जाळे पसरलेले असणे, सर्वाधिक महसूल प्राप्त होऊनही, केंद्राकडून पूरेशा प्रमाणात राज्यास निधी प्राप्त न होणे, महिला सुरक्षा, प्रलंबित योजना, रेल्वे समस्या, सुरक्षित प्रवास आणि प्रवाशांना अत्याधुनिक सेवा सुविधांकरिता, आवश्यक निधीची तरतूद करून व्यवस्थापन करण्यासाठी महाराष्ट्र राज्याकरिता 'स्वतंत्र महाराष्ट्र रेल महामंडळ' स्थापन करावे अशी आग्रही मागणी, राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.

**श्री. सुनिल केदार, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ४५, ४६, २९९ व ३००**

(४५) " शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४६) " राज्यात औद्योगिक वसाहती व कारखान्यांचे वाढते प्रमाण, त्यामुळे बहुतांश जिल्हयात वायू प्रदूषण व जल प्रदूषणाची निर्माण झालेली समस्या, कोळसा खाणीपासून होत असलेले प्रदूषण, उद्योजक करारनामा करून देखील प्रदूषणाबाबत न पाळत असलेले

नियम, त्यातच शासनाला अपुऱ्या साधन सामुग्रीमुळे प्रदूषणावर आळा घालण्याकरिता येत असलेले अपयश, परिणामी जनतेच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न, या सर्वांवर आळा घालण्याकरिता शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२९९) " शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, कीटकनाशके यांच्या किमतीमध्ये सतत होणारी वाढ तसेच शेतकऱ्यांना शेती मालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेती मालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३००) " विदर्भातील वीज निर्मितीचे अनेक प्रकल्प असणे, राज्यातील वीज निर्मितीपैकी निम्मा वीज निर्मितीचा वाटा विदर्भाचाच असणे, मोठया प्रमाणावर वीज निर्मिती करूनही विदर्भातच मोठया प्रमाणात भारनियमन होणे, भारनियमनामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणीक नुकसान, व्यापारी जगताचे होणारे आर्थीक नुकसान, विदर्भातील वीज इतरत्र जात असतांना सुद्धा विदर्भातील वीज ग्राहकांकडून वीज हाणीच्या नावाने पैसा वसूल करणे, विजे अभावी शेती सिंचनापासून वंचित राहाणे, यामूळे शेतकऱ्यांच्या पिकावर होणारे प्रंचड नुकसान, विजे अभावी विदर्भात उद्योग न येणे, परिणामी, बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, विदर्भाच्या वाट्याला प्रदूषण येवून विकासही न होणे, विदर्भात उत्पादीत उद्योगांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याची नितांत गरज लक्षात घेता तथा विदर्भातील भारनियमन रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. संजय पोतनीस, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ४८, ५० व ५३**

(४८)" दारिद्रयरेषेखालील कुटुंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटुंबाचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्रयरेषेखाली असणाऱ्या कुटुंबाना पिवळया रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिक दृष्टया दुर्बल जनतेला दारिद्रयरेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५०) “ राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनांचे काम अदयापही पूर्ण झालेले नसल्यामुळे विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इत्यादी बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(५३) “ राज्यातील खेळांडूची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पीछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगिण विकास होण्याकरिता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्राना आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**ॲड. भीमराव धोंडे, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ५१ व ५८**

(५१) “ राज्यातील विनाअनुदान तत्वावर मान्यता देवून सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये आणि इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध न होणे, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(५८) “ राज्यातील विशेषतः मराठवाड्यातील सर्व गावे बारमाही वाहतुकीस योग्य व्हावीत, नद्या, नाले व मोऱ्या यांच्यावरील पुलांची बांधकामे व ग्रामीण भागातील रस्ते दुरुस्ती करून वाहतुकी योग्य करण्यासाठी धडक योजना शासनाने हाती घ्यावी आणि जिल्हा स्तरावर रस्त्याच्या अंतराच्या प्रमाणात ग्रामीण रस्त्यांच्या दुरुस्ती आणि मजबुतीकरणासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. अमर काळे, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ५२, ५४, ३०१ व ३०२**

(५२) “ शेतीची नापिकी, अतिवृष्टी जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसानभरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पनाच्या

जाचक निकषामुळे शेतकरी वंचित रहात असणे, याला शंभर वर्षे जुनी ब्रिटीश व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्यशासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५४)" राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३०१)" विदर्भात वीज निर्मितीचे अनेक प्रकल्प असणे, राज्यातील वीज निर्मितीपैकी निम्मा वीज निर्मितीचा वाटा विदर्भाचाच असणे, मोठ्या प्रमाणावर वीज निर्मिती करूनही विदर्भातच मोठया प्रमाणात भारनियमन होणे, भारनियमनामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणीक नुकसान, व्यापारी जगताचे होणारे आर्थिक नुकसान, विदर्भातील वीज इतरत्र जात असतांना सुद्धा विदर्भातील वीज ग्राहकांकडून वीज हाणीच्या नावाने पैसा वसूल करणे, विजे अभावी शेती सिंचनापासून वंचित राहाणे, यामुळे शेतकऱ्यांच्या पिकावर होणारे प्रचंड नुकसान, विजे अभावी विदर्भात उघोग न येणे, परिणामी, बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, विदर्भाच्या वाट्याला प्रदुषण येवून विकासही न होणे, विदर्भात उत्पादीत उद्योगांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याची नितांत गरज लक्षात घेता तथा विदर्भातील भारनियमन रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३०२) " राज्यातील उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रंचड प्रमाणात वाढणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरूणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील बेरोजगार तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना भूमीपुत्रांना प्राध्यान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ६५, ६७, ६८ व ६९**

(६५) "खानदेशात सिंचनाच्या अपूर्ण सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नुकसान सहन करीत असून अनेक सिंचन योजना तसेच उपसा जलसिंचन योजना/पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत राहणे, त्याचा लाभ शेतकऱ्यांना न होणे, तसेच नवीन प्रकल्प योजना होणे गरजेचे असताना प्रकल्प न होणे, प्रकल्प न झाल्याने शेतकऱ्यांची सिंचनाची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याने सदर गैरसोय लक्षात घेता खान्देशाची प्रगती होण्याचे दृष्टीने सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(६७) " राज्यातील विशेषतः मुंबई, ठाणे, नवी मुंबई व इतर शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनांच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास परिणामी वाहतुकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(६८) " राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायती राज समितीच्या धर्तीवर विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(६९) " शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. शशिकांत शिंदे, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ७०, ७१, ७२ व ७४**

(७०) " महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव चिरंतर स्मरणात राहावे, यासाठी दादर रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्थानक असे नाव देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७१) " शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७२) " राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपुर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७४) "केंद्र सरकारने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्रामसडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरु कराव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. राहुल जगताप, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ७५, ७६, ७७, ७८ व ७९**

(७५) " राज्यातील नगरपालिका महानगरपालिकांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायती राज समितीच्या धर्तीवर विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयक्त समिती स्थापन करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७६) " शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसानभरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७७) " राज्यात स्थापन होणाऱ्या औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांमध्ये ८० टक्के स्थानिक तरुणांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७८) " राज्यात दिवसेंदिवस वनराईचे कमी होत असलेले प्रमाण, बेसुमार वृक्ष तोडीने होणारी जमिनीची धूप, पर्जन्यमानात झालेली घट, सिंचन व पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली समस्या, पर्यावरणाचा बिघडलेला समतोल इत्यादी बाबी लक्षात घेता, त्यासाठी निश्चित स्वरुपाचा कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७९) " शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ८०, ८१, ८२, ८३ व ८४**

(८०) " कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी तसेच मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने त्याचप्रमाणे शहरीकरणाच्या विकासाच्या दृष्टीने पाण्याच्या निर्माण होत असलेली समस्या सोडविण्यासाठी कोयना धरणाचे वीज निर्मितीनंतर वशिष्ठ नदीच्या (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) पात्रातून वाया जाणारे पाणी कोकणातील जिल्ह्यांना तसेच मुंबईसह ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिकांच्या पाण्याची समस्या/दुष्काळ दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने चिपळून तालुक्यातील वशिष्ठ नदीतील पाणी परशुराम घाटाच्या पायथ्यातून उचलून (लिफ्टिंग) निसर्गाच्या गुरुत्वाकर्षणाच्या शक्तीने पूर्ण कोकण विभागाला पुरविण्याकरिता शासनाने एक खास कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरेने युद्धपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(८१) " राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यांतील प्रदूषित सांडपाणी नदीत

सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून त्यामुळे रहिवाश्यांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवाच्या उपजिविकेच्या साधनांवर होणारा विपरित परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदूषण प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(८२)" राज्यातील आर्थिकदृष्टया मागासलेल्या घटकांना शासकीय सेवेत काही जागांचे आरक्षण ठेवण्याची तरतूद करण्याबाबत व त्यांच्यासाठी कल्याणकारी योजना आखण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(८३)" राज्यात दिवसेंदिवस जमिनीवरील व भूगर्भातील पाण्याची पातळी वेगाने कमी होत असल्याने व त्यातच पावसाचे प्रमाण देखील कमी होत असल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा व शेतीच्या पाण्याचा दिवसेंदिवस ज्वलंत होत चाललेला प्रश्न लक्षात घेता जलसंधारणाचा कार्यक्रम प्रभावीरित्या राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(८४)" तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणाऱ्या गावकऱ्यांना त्यांच्या कामासाठी वेगवेगळ्या कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही व आथिर्क भुर्दंडही सोसावा लागू नये यासाठी शासनाने योजनाबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. कुणाल पाटील, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ८५ व ८६**

(८५)" राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीतील विहिरी व विद्युत पंपांचा मोठ्या प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत कनेक्शन मिळण्याकरिता होणारा विलंब त्यामुळे विद्युत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या फळबाग विकास योजनांचे पाण्या अभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(८६) " राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणावर स्थानिक भूमीपूत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपूत्राची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयामध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपूत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरूणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील बेरोजगार भूमीपूत्रांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी यापुढे राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनांवरील कार्यालयांमध्ये नोकरी देताना भूमीपूत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. वैभव पिचड वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ९०, ९१, ९२ व ९३**

(९०) " शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसानभरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(९१) " राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता या किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देवून या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(९२) " द्रारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटुंबांचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटुंबांना पिवळया रंगांच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्यावतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आथिर्कदृष्टया दुर्बल जनतेला दारिद्र्यरेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(९३) “ राज्यातील विनाअनुदान तत्वावर मान्यता देवून सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. कालीदास कोळंबकर, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ९५, ९७ व ९८**

(९५) “ मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळ्यात इमारती कोसळून जीवितहानी व वित्तहानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच इमारतींच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठ्या प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाश्यांत पसरलेला तीव्र असंतोष, यासंदर्भात साकल्याने विचार करून त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(९७) “ राज्यात रस्ते अपघातात ताबडतोब व योग्य उपचार मिळत नसल्याने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, अपघातग्रस्तांना वेळीच योग्य उपचार मिळावेत म्हणून मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग, मुंबई-गोवा (वडखळ नाका), नाशिक-शिर्डी, पुणे-कोल्हापूर, नाशिक-धुळे या सारख्या जास्त वाहनांची वर्दळ असलेल्या द्रुतगती मार्गावर शासनाने ट्रॉमा केअर सेंटर सुरु करावेत तसेच मुंबई-पुणे राष्ट्रीय मार्गावर चौक लोधिवली (ता.खालापूर, जि.रायगड) येथे अद्ययावत असलेल्या जे.एच.अंबानी हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय सेवा २४ तास देण्याची व्यवस्था करणे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(९८) “ राज्यातील दारिद्रय रेषेखालील व वयाची ६० वर्षे पूर्ण करणाऱ्या वयोवृद्ध शेतकऱ्यांना तसेच रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या कष्टकरी मजुरांना दरमहा ५०० ते १५०० रुपये निवृत्ती वेतन शासनाकडून देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्रीमती अमिता चव्हाण, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १००, १०२ व १०४**

(१००) " राज्यात राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणात होत असलेले अपघात, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालये नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्गावर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान-लहान उपचार केंद्रे सुरु करणे, सदरची उपचार केंद्रे सुरु झाल्यास तेथे वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचारी नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळणे, राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होणे, तसेच अपघातग्रस्तांना वेळीच उपचार मिळणे, यासाठी राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर ५० कि.मी. अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र उघडण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१०२) " राज्यात महिला व तरुण मुलींवर होणारे अत्याचार व त्यांचे होणारे मृत्यू विचारात घेता महिलांवरील अत्याचारांबाबतचे खटले विनाविलंब निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र न्यायालये स्थापन करण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१०४) " राज्यातील विशेषतः सर्व गावे बारमाही वाहतुकीस योग्य व्हावीत याकरिता सर्व ग्रामीण भागातील रस्त्यांची पाहणी करुन आवश्यक असेल तेथे नद्या, खाड्या, नाले व मोऱ्यांवर पूल बांधण्याची धडक योजना शासनाने हाती घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्रीमती दिपिका चव्हाण, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १०६, १०७, १०८ व १०९**

(१०६) " राज्यात व देशामध्ये स्त्री शिक्षणाची गुढी उभारणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांचे कार्य संपूर्ण महाराष्ट्रातील व देशातील जनतेला प्रेरणा देणारे असणे, महिलांच्या कल्याणासाठी व त्यांच्या उत्थानासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचलेले असणे, अशा या थोर व्यक्तींना मरणोत्तर भारतरत्न प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१०७) " राज्याच्या सुवर्ण चतु:ष्कोनातील एक महत्त्वाचे शहर असल्याने नाशिक शहराला लागू असलेल्या ग्रामीण भागाचे झपाट्याने शहरीकरण होत असणे, त्यामुळे येथील पायाभूत सुविधांचा नियोजनबद्ध विकास होण्यासाठी एमएमआरडीए मुंबई व नागपूर सुधार प्रन्यासच्या धर्तीवर नाशिक क्षेत्र विकास प्राधिकरण स्थापन करून ह्या प्राधिकरणाला निधी उपलब्ध करू द्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१०८) " सोलापूर विद्यापीठाला "राजमाता अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ " तर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला "बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ " नामविस्तार करण्याची राज्यातील जनतेची मागणी असल्यामुळे राज्य शासनाने या विद्यापिठांचा नामविस्तार करण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१०९) " महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव चिरंतर स्मरणात रहावे, यासाठी दादर रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्थानक असे नाव देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. हसन मुश्रीफ वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ११०, १११, ११३ व ११४**

(११०) " राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायत राज समितीच्या धर्तीवर विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१११) " राज्यात अनाथ, निराधार, परित्यक्ता, घटस्फोटिता, विधवा अनैतिकतेतून मातृत्व लाभलेल्या आपदग्रस्त व शिक्षणाचा अभाव असणाऱ्या महिलांचा यात होणारा शरीरिक, मानसिक व सामाजिक छळ थांबवून त्यांची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नती होण्याच्या दृष्टीने महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(११३) " राज्यातील ग्रामीण भागातील सर्व खेडी नजीकच्या महामार्गांना डांबरी रस्त्याने जोडण्यासाठी शासनाने एक कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(११४) " राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पद्धतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. हनुमंत डोळस, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ११७, ११८, ११९, १२० व १२१**

(११७) " राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणावर स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध होत नसल्याने उद्योगांमध्ये भूमिपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत असणे, लाखो तरुण नोकरी, रोजगारासाठी भटकत असणे, स्थानिक भूमिपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, दिवसेंदिवस सदरची समस्या गंभीर स्वरुपाची बनत चाललेली असणे, राज्यातील बेरोजगार भूमिपूत्रांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी यापुढे राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनेवरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना भूमिपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने योग्य ती पावले उचलावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(११८) " शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसानभरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित रहात असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(११९) " राज्यातील बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई, तसेच विविध कारणामुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल, विचारात घेता टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम

आखावा व त्यासाठी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे. ”

(२३७) " कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी तसेच मुंबर्इच्या वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने त्याचप्रमाणे शहरीकरणाच्या विकासाच्या दृृष्टीने पाण्याची निर्माण होत असलेली समस्या सोडविण्यासाठी कोयना धरणाचे वीज निर्मितीनंतर वशिष्ठ नदीच्या (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) पात्रातून वाया जाणारे पाणी कोकणातील जिल्हयांना तसेच मुंबईसह ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिकांच्या पाण्याची समस्या, दुष्काळ दूर करण्याच्या दृृष्टीने शासनाने चिपळूण तालुक्यातील वशिष्ठ नदीतील पाणी परशुराम घाटाच्या पायथ्यापासून उचलून (लिफ्टिंग) निसर्गाच्या गुरुत्वा कषर्णाच्या शक्तीने पूर्ण कोकण विभागाला पुरविण्याकरीता शासनाने एक खास बाब म्हणून कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरेने युद्धपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**डॉ. सतीश पाटील, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २३०, २३२, २३३ व २३४**

(२३०) " राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीतील विहिरी व विद्युत पंपाचा मोठया प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत कनेक्शन मिळण्याकरीता होणारा विलंब त्यामुळे विद्युत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या ऊस पिकांचे पाण्या अभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२३२) " राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठयांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२३३) " शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेती मालाचे न परवडणारे भाव

विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेती मालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२३४) " राज्यात उद्योग जगतात मोठया प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय,निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधान सभा शासनास करीत आहे."

**डॉ. राहूल पाटील, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २३६ व २३९**

(२३६) " देशाला स्वातंत्र्य मिळण्याकरिता लढा देऊन त्यासाठी काळया पाण्याची शिक्षा भोगून जनतेला मातृभूमी प्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतीकारकांचे प्रेरणास्थान असलेले स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना मरणोत्तर " भारतरत्न " प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२३९) " राज्यात महिला व तरुण मुलींवर होणारे अत्याचार व त्यांचे होणारे मृत्यू विचारात घेता महिलांवरील अत्याचारांबाबतचे खटले विनाविलंब निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र न्यायालये स्थापन करण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**डॉ. संतोष टारफे, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २४६, २४७ व २४९**

(२४६) " राज्यातील विशेषतः मराठवाडयातील सर्व गावे बारमाही वाहतुकीस योग्य व्हावीत, तेथे नद्या, नाले व मोऱ्या यांच्यावरील पुलांची बांधकामे दुरुस्ती करुन ग्रामीण भागातील रस्ते वाहतुकीस योग्य करण्यासाठी धडक योजना शासनाने हाती घ्यावी आणि जिल्हा स्तरावर रस्त्याच्या अंतराच्या प्रमाणात ग्रामीण रस्त्याच्या दुरुस्ती व मजबुतीकरणासाठी निधी उपलब्ध करावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२४७) " केंद्र शासनाने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्रामसडक योजना अंमलात आणलेली असणे, त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरु कराव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२४९) " राज्यातील खेळांडूची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पीछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगिण विकास होण्याकरीता व दर्जेदार खेळाडूं तयार करण्यासाठी तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्राना आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २५०, २५१, २५२, २५३ व २५४**

(२५०) " राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीतील विहिरी व विद्युत पंपांचा मोठया प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत कनेक्शन मिळण्याकरिता होणारा विलंब त्यामुळे विद्युत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या फळबाग विकास योजनांचे पाण्या अभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२५१) " दारिद्रय रेषेखालील कुटूंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटूंबांचे सर्वेक्षण योग्य न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या कुटूंबांना पिवळया रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिक दृष्टया दुर्बल जनतेला दारिद्रय रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२५२) " राज्यातील विनाअनुदान तत्त्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदाना अभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम

विचारात घेता विना अनुदान तत्त्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यिमक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(२५३) “ शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेती मालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेती मालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(२५४) “ राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरीत करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधी अभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नाही, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने या सर्व नळ पाणीपुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. नसीम खान, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २५९, २६०, २६१ व २६२**

(२५९) “ मुंबई व उपनगरातील खाजगी विकासकांनी बांधलेल्या सदनिकांच्या किंमती सर्वसामान्याच्या आवाक्याबाहेर असल्याने म्हाडाने मुंबई व उपनगरातील नागरिकांसाठी मोठया प्रमाणावर सर्वसामान्य ग्राहकांना परवडतील अशा सदनिका बांधण्याचा कालबध्द कार्यक्रम शासनाने तातडीने हाती घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(२६०) “ मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी करुन त्याचा विकास करणे, पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठया प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात सांकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(२६१)" राज्यातील खेळांडूची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पीछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगिण विकास होण्याकरीता व दर्जेदार खेळाडूं तयार करण्यासाठी तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्राना आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२६२) " राज्यात महापूर, दुष्काळ, चक्रीवादळ, गारपीट, भूकंप वगैरे नैसर्गिक संकटाना तोंड देण्यासाठी व बाधित नागरीकांना त्वरेने पुरेसे अर्थसहाय्य करण्यासाठी तसेच अशा आपत्तींना तोंड देण्यासाठी पुरेसा निधी गोळा करणे व आपद्ग्रग्रस्तांचे पुनर्वसन विनाविलंब होण्याच्या दृष्टीने शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. दिपक चव्हाण, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २६३, २६४, २६५ व २६६**

(२६३) " राज्यात उद्योग जगतात मोठया प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय,निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२६४) " राज्यातील जीवनावश्यक वस्तूंचे कडाडलेले भाव लक्ष्यात घेता, राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानातून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्न धान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंचा नियमित पुरवठा होण्यासाठी सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२६५) " महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव चिरंतर स्मरणात राहावे, यासाठी दादर रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्थानक असे नाव देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२६६) " राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २६८, २६९, २७०, २७१ व २७२**

(२६८) " राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतीना देखभालीसाठी हस्तांतरीत करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधी अभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नसणे, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने हया सर्व नळ पाणी पुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२६९) " राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीतील विहिरी व विद्युत पंपाचा मोठया प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत कनेक्शन मिळण्याकरीता होणारा विलंब त्यामुळे विद्युत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या उस पिकांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२७०) " राज्यातील वेगवेगळया प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२७१) " राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता या किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी

अन्य आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देवून या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२७२) " राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यांतील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून त्यामुळे रहिवाश्यांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवाच्या उपजिविकेच्या साधनांवर होणारा विपरित परिणाम लक्षांत घेता राज्यांतील जलप्रदूषण प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. दत्तात्रय भरणे, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २७३, २७४, २७५, २७६ व २७७**

(२७३) " राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यांतील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून त्यामुळे रहिवाश्यांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवाच्या उपजिविकेच्या साधनांवर होणारा विपरित परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदूषण प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२७४) " शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेती मालाचे न परवडणारे भाव विचारात घेता उत्पादन खर्चावर आधारित असे शेती मालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२७५) " राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक

कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावंर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२७६) " राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठयांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२७७) " राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्तापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. अजित पवार, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २७८, २७९, २८०, २८१ व २८२**

(२७८) " राज्यात उद्योग जगतात मोठया प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२७९) " शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२८०) " महाराष्ट्राचे भाग्यविधाते महात्मा गांधींच्या स्वातंत्र्य लढयात सहभागी झालेले स्वतंत्र महाराष्ट्राचे जनक, आपले सर्व आयुष्य राष्ट्र उभारणीच्या कार्यात वेचणाऱ्या, तळागाळातील समाजासाठी आर्थिक विकासाची योजना राबविणारे दिन-दलितांचे नेते यशवंतराव चव्हाण यांना मरणोत्तर भारतरत्न प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधान सभा शासनास करीत आहे."

(२८१) " पुणे महापालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांच्या पुर्नबांधणीसंदर्भात शासनाचे असलेले उदासिन धोरण तसेच प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांची दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात वाडे कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच वाडयांच्या पुर्नरचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यामुळे पुणे महापालिका क्षेत्राकरीता मुंबईच्या धर्तीवर दुरुस्ती मंडळाची स्थापना करण्याची येथील नागरीकांची असलेली मागणी, या संदर्भात साकल्याने विचार करुन परिणामकारक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२८२) " राज्यातील देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळाडूंचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागातील होतकरू व तरुण खेळाडू देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरिता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २८३, २८४, २८५, २८६ व २८७**

(२८३) " राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्तापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचारधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२८४) " राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता या किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व कायम राखण्याच्या दृष्टीने शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२८५) " राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमिपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमिपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय, तसेच खाजगी अस्थापानांवरील कार्यालयांमध्ये नोकरी देताना भूमिपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२८६) " राज्यातील विशेषतः मुंबई, ठाणे, नवी मुंबई व इतर शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनांच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन नागरीकांना सोसावा लागणारा त्रास परिणामी वाहतुकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२८७) " राज्यात महिला व तरुण मुलींवर होणारे अत्याचार व त्यांचे होणारे मृत्यू विचारात घेता महिलांवरील अत्याचारांबाबत खटले विनाविलंब निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र न्यायालये स्थापन करण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. संदीप नाईक, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २८८, २९७ व २९८**

(२८८) " राज्यातील उद्योग जगतात मोठ्या प्रमाणावर स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमिपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात सुशिक्षित बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमिपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील

सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्याचे व असंतोषाचे वातावरण, राज्यातील बेरोजगार भूमिपुत्रांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनांवरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना भूमिपुत्रांना प्राधान्याने नोकरीत सामावून घेण्यासाठी तसेच बेरोजगारांची समस्या परिणामकारक पद्धतीने सोडविण्यासाठी आणि सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफरास ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२९७) " राज्यातील मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग इत्यादी जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापि पूर्ण झालेले नसल्याने तसेच शासनाने प्रकल्पग्रस्तांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न केल्यामुळे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पासाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२९८) " राज्यातील विशेषतः मुंबई, ठाणे, नवी मुंबई व इतर शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनाच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास परिणामी वाहतुकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**डॉ. अशोक उईके, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३०४, ३०५ व ३०६**

(३०४) " राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३०५) " राज्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटुंबाचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या कुटूंबाना पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्यावतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्र्य रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३०६) " शेतीची नापीकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असुनही पीक विमा नुकसान भरपाई पासुन आणेवारी व उबंरठा उत्पादनाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचीत राहणे, याला शंभर वर्षे जुनी ब्रिटीश कालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३०७, ३०८, ३०९, ३१० व ३११**

(३०७) " शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असूनही पीक विमा नुकसान भरपाईपासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषांमुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्षे जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३०८) " राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती तसेच इतर महानगरपालिकांच्या लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, महानगरपालिका क्षेत्राबाहेर लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरामधील कचरा टाकतांना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचराडेपोच्या परिसरातील

नागरीकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा असणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासीय आणि ग्रामवासीय यांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इ. बार्बीना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३०९) " महाराष्ट्राचे भाग्य विधाते महात्मा गांधीच्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झालेले स्वतंत्र महाराष्ट्राचे जनक, आपले सर्व आयुष्य राष्ट्र उभारणीच्या कार्यात वेचणाऱ्या, तळागाळातील समाजासाठी आर्थिक विकासाची योजना राबविणारे दिन-दलितांचे नेते यशवंतराव चव्हाण यांना मरणोत्तर "भारतरत्न " प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३१०) " पुणे महापालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांच्या पुनर्बांधणी संदर्भात शासनाचे असलेले उदासीन धोरण तसेच प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांची दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळ्यात वाडे कोसळून जीवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच वाड्यांच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यामुळे पुणे महापालिका क्षेत्राकरीता मुंबईच्या धर्तीवर दुरुस्ती मंडळाची स्थापना करण्याची येथील नागरीकांची असलेली मागणी, या संदर्भात साकल्याने विचार करुन परिणामकारक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३११) " जीवनावश्यक वस्तूंचे कडाडलेले भाव लक्षात घेता, राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानातून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंचा नियमित पुरवठा होण्याच्या दृष्टीने सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**ॲड. संजय धोटे वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३१२ व ३१३**

(३१२) " राज्यात विशेषतः ग्रामीण भागातील बहुसंख्य गावातून उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणीटंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजना व त्यांच्या अंमलबजावणीत होणारी दिरंगाई, यामुळे ग्रामीण जनतेचे पिण्याच्या

पाण्याअभावी होणारे हाल विचारात घेता कायमस्वरूपी पाणीटंचाई दूर करण्यासाठी शासनाने ठोस कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३१३) " राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता या किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन देउन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करवी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास शासनास करीत आहे."

**श्री. गोवर्धन शर्मा, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३१७ व ३१८**

(३१७) " राज्यातील महानगरपालिका व नगरपरिषदांमध्ये मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली समस्या, घनकचऱ्यावर पुर्नप्रक्रीया करता येत नसल्यामुळे दुर्गंधीमुळे नागरीकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, याकरीता या घनकचऱ्यामधून निर्माण होणाऱ्या मिथेन गॅस पासून वीज निर्मिती करण्यासाठी तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३१८) " अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा संत गजानन महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोला असा नामविस्तार करण्याची राज्यातील जनतेची मागणी असल्यामुळे राज्य शासनाने या विद्यापीठाचा नामविस्तार करण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्रीमती संगीता ठोंबरे, वि.स.स. यांचा ठराव क्रमांक ३२१**

(३२१) " शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, कीटकनाशके यांच्या किमतीमध्ये दिवसेंदिवस भरमसाठ होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता उत्पादन खर्चावर आधारित शेती मालाला सुधारित वाढीव हमी भाव मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. गणपतराव देशमुख वि.स.स. यांचा ठराव क्रमांक ३२३**

(३२३) " राज्यामध्ये कोट्यावधी रुपये खर्च करून गेल्या काही वर्षाच्या काळामध्ये ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी अनेक प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना शासनाने तयार केल्या असणे, त्यापैकी बऱ्याच योजना वर्षानुवर्षे बंद असणे, त्या योजना चालू करण्याच्या दृष्टीने शासनाला उपाययोजना सुचविण्यासाठी दोन्ही सभागृहाच्या १५ सदस्यांची समिती शासनाने नेमावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. राजेश काशीवार वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३३०, ३३१, ३३२ व ३३३**

(३३०) " राज्यात दिवसेंदिवस वाढती लोकसंख्या, औद्योगिक वसाहती, त्यामुळे शहरांमध्ये वाढत असलेली गुन्हेगारी, अपुरी पोलीस व्यवस्था, त्यामुळे पोलिसांवर पडणारा मानसिक ताण, त्यामुळे पोलिसांनी आत्महत्या करण्याच्या घटना उघडकीस येणे, त्यातच महिलांवर वाढलेले अत्याचार, पोलिसांच्या अपुऱ्या संख्येमुळे तपासास लागणारा विलंब, त्यामुळे महिलांमध्ये वाढलेला असंतोष, त्याकरीता पोलिसांच्या संख्येत करावयाची वाढ, यासाठी पोलिसांच्या मानसिक स्थितीत सुधारणा आणून महिलांवरील वाढते अत्याचार थांबविण्यासाठी शासनाने योग्य उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३३१) " राज्यातील दिवसेंदिवस वनराईचे कमी होत असलेले प्रमाण, बेसुमार वृक्ष तोडीने होणारी जमिनीची धूप, पर्जन्यमानात झालेली घट, सिंचन व पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली समस्या, पर्यावरणाचा बिघडलेला समतोल इत्यादी बाबी लक्षात घेता, त्यासाठी निश्चित स्वरुपाचा कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३३२) " राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यांतील प्रदुषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः विदर्भातील नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून त्यामुळे रहिवाशांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवांच्या उपजीविकेच्या साधनांवर होणारा विपरित परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदुषणावर प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(शा.म.मु.) एचबी १३७२—८ (१२००—११-२०१८)

(३३३) " राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतातील विहीरी व विद्युत पंपांचा मोठ्या प्रमाणात राहीलेला अनुशेष, विद्युत कनेक्शन मिळण्याकरीता होणारा विलंब, त्यामुळे विद्युत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या फळबाग विकास योजनांचे पाण्या अभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकपणे करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. संजय केळकर, वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३३५, ३३६, ३३७, ३३८ व ३३९**

(३३५) " राज्यातील नाशिक, ठाणे. पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती तत्सम इतर नगरपालिकांच्या लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या वसाहती, त्यामुळे मोठ्या प्रामाणात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थाचा होणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासीय आणि ग्रामवासीय यांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इत्यादी बाबीना आला घालण्यासाठी राज्यपातळीवर स्वंतत्र कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास शासनास करीत आहे."

(३३६) " राज्यातील विनाअनुदान तत्त्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये आणि इतर शैक्षणिक सोयीसुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर होणारा विपरीत परिणामम विचारात घेता विनानुदानित तत्वावर मान्यता दिलेल्या राज्यातीलल सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३३७) " मुंबईसह राज्यात रेल्वेचे सर्वाधिक जाळे, पसरलेले असणे, मुंबई शहरातून सर्वाधिक महसूल प्राप्त होऊनही केंद्राकडून राज्यास पुरेशा प्रमाणात निधी प्राप्त न होणे, महिला सुरक्षा, प्रलंबित योजना, रेल्वे समस्या, सुरक्षित रेल्वे प्रवास, आणि प्रवाशांना अत्याधुनिक सेवा सुविधा करिता आवश्यक निधीची तरतूद करून व्यवस्थापन करण्यासाठी महाराष्ट्र राज्याकरिता 'स्वंतत्र महाराष्ट्र रेल महामंडळ' स्थापन करावे, अशी आग्रही मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३३८) " राज्यात रस्ते अपघातात ताबडतोब व योग्य उपचार मिळत नसल्याने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, अपघातग्रस्तांना वेळीच योग्य उपचार मिळावेत म्हणून मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग, मुंबई-गोवा (वडखळ नाका), नाशिक-शिर्डी, पुणे-कोल्हापूर, नाशिक-धुळे या सारख्या जास्त वाहनांची वर्दळ असलेल्या द्रुतगती मार्गावर शासनाने अपघातग्रस्तांवर तातडीने उपचार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने काही अंतरावर प्राथमिक आरोग्य केंद्र उभारावीत व प्रत्येक आरोग्य केंद्रात एक रुग्णवाहिका उपलब्ध ठेवावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३३९) " राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन विकसित करण्याबाबत तसेच त्याठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. राजाभाऊ (पराग) वाजे वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३४२ व ३४३**

(३४२) " दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची यादी तयार करताना अनेक कुटुंबांचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्य रेषेखालील असणाऱ्या कुटुंबांना पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित राहावे लागणे, शासनाच्या वतीने १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्र्य रेषेखालील योजनांचे लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडून इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३४३) " राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमिपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेल्या नोंदी, उद्योगांमध्ये भूमिपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील बेरोजगार भूमिपुत्रांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी यापुढे राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनेवरील कार्यालयांमध्ये नोकरी देताना भूमिपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. राज पुरोहित, वि.स.स. यांचा ठराव क्रमांक ३४९ व ३५०**

(३४९) " मुंबई शहरातील मरीन लाईन्स रेल्वे स्थानकाचे नामकरण करुन त्यास मुंबादेवी असे नाव देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३५०) " लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या वास्तव्याने पावन झालेली लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई येथील सरदारगृह ही ऐतिहासिक वास्तू असणे, स्वातंत्र्य लढ्यात महत्त्वाची भूमिका असूनही आजपर्यंत लोकमान्य टिळकांचे एकही राष्ट्रीय स्मारक मुंबई शहरात नसणे, त्यांचे स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचे अमूल्य मार्गदर्शन व कार्य पाहता मुंबईतील त्यांचे वास्तव्य असलेल्या सरदारगृह यास राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करून व भव्य संग्रहालय उभारावे जेणे करून भावी पिढीत लोकमान्य टिळकांची राष्ट्रप्रेरणा मिळत राहील, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. विजय काळे वि.स.स. यांचा ठराव क्रमांक ३५१, ३५२, ३५३ व ३५४**

(३५१) " राज्यात महिला व तरुण मुलींवर होणारे अत्याचार व त्यांचे होणारे मृत्यू विचारात घेता महिलांवरील अत्याचारांबाबतचे खटले विनाविलंब निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र न्यायालये स्थापन करण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३५२) " देशाला स्वातंत्र्य मिळण्याकरिता लढा देऊन त्यासाठी काळ्या पाण्याची शिक्षा भोगून जनतेला मातृभूमी प्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतीकारकांचे प्रेरणास्थान असलेले स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना मरणोत्तर "भारतरत्न" प्रदान करण्याबाबत राज्य? शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करित आहे."

(३५३) " राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती आणि तत्सम इतर महानगरपालिकांच्या लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरिकांच्या

आरोग्यास निर्माण झालेला धोका, होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होत असलेला तीव्र विरोध, परिणामी नगरवासीय आणि ग्रामवासीय यांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इ. बाबींना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३५४) " पुणे महापालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांच्या पुनर्बांधणीसंदर्भात शासनाचे असलेले उदासिन धोरण तसेच प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांची दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळ्यात वाडे कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच वाडयांच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यामुळे पुणे महापालिका क्षेत्राकरीता मुंबईच्या धर्तीवर दुरुस्ती मंडळाची स्थापना करण्याची येथील नागरीकांची असलेली मागणी, या संदर्भात साकल्याने विचार करुन परिणामकारक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**अठरा.** : सभागृहासमोर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी स्वतंत्ररित्या वितरित करण्यात येईल).

**विधान भवन,**
मुंबई.
दिनांक : १५ नोव्हेंबर, २०१८.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.